महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपुर

**GOVT. MEDICAL COLLEGE, NAGPUR**

जा.क्र.कॉलेज/आस्था -४/वर्ग ४ पदभरती/ कागदपत्र पडताळणी / 24082 /२०२४, दि:- २८/१०/२०२४

# कागदपत्र पडताळणी करीता महत्वाची सुचना

वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये विभागाच्या अधिनस्त असलेल्या नागपूर जिल्हातील शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालय व संलग्णीत रुग्णालयातील गट-ड (वर्ग-४) संवर्गातील समकक्ष सरळसेवेच्या ६८० रिक्त पदांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्या करीता उमेदवारां कडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले असून (ऑनलाईन कंप्यूटर बेस टेस्ट) परीक्षा घेवून त्याचा निकाल संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक ३०/०९/२०२४ ला प्रसिध्द करण्यात आला आहे.

उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्या करीता गुणवत्ता प्राप्त उमेदवारांची कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणी करण्या करीताचे वेळापत्रक व प्रवर्गनिहाय उमेदवारांची यादी यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. त्या प्रवर्गनिहाय यादीतील उमेदवारांचे कागदपत्रे/प्रमाणपत्रे दिनांक ०७/११/२०२४, दिनांक ०८/११/२०२४, दिनांक ११/११/२०२४ व दिनांक १२/११/२०२४ ला वेळापत्रका प्रमाणे पडताळणी करण्यात येईल. सर्व उमेदवारांनी प्रवर्गनिहाय यादीतील आपले नाव काळजीपूर्वक पाहून वेळापत्रकामध्ये दिलेल्या दिनांकास व वेळेवर खाली नमूद केलेल्या स्थळी उपस्थित राहावे.

**<u>स्थळ</u> :-** **एम.आय.टी. हॉल, ई-ग्रंथालय (E-Library) इमारती मध्ये, अधिष्ठाता कार्यालयाचे बाजुला, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर**

१) निवड यादीतील सर्व उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी वेळापत्रका प्रमाणे विहीत दिनांकास विहीत वेळेत, विहीत स्थळी कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणी करीता वेळेवर संपूर्ण आवश्यक मूळ कागदपत्रासह व ०२ संच छायाप्रत स्वसाक्षांकित प्रतिसह उपस्थित राहावे.

२) वेळापत्रका प्रमाणे उमेदवारांनी विहीत वेळेत उपस्थित राहण्याची दक्षता घ्यावी. जे उमेदवार कागदपत्र/प्रमाणपत्र पडताळणी करीता अनुपस्थित राहतील त्या उमेदवारांना अपात्र घोषीत केले जाईल. नंतर त्या उमेदवारांचे कोणत्याही निवेदनावर विचार केला जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राचे आधारे कागदपत्रे तपासणी वेळी तपासण्यात येतील. सबब उमेदवारांनी मूळ कागदपत्रे सोबत आणणे व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती उपलब्ध करुन देणे उमेदवारांना अनिवार्य राहील.

४) मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्यात येईल त्या तपासणीच्या वेळी तसेच निवड प्रक्रियेच्या दरम्यान त्या मधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

५) उमेदवारांना कागदपत्र पडताळणी करीता बोलाविले म्हणजे त्यांना नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला किंवा त्यांची निवड झाली असे म्हणता येणार नाही.

६) उमेदवारांना सुचित करण्यात येते की, कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीच्या वेळेस त्यांनी भ्रमणध्वनी (Mobile) बंद ठेवणे आवश्यक आहे. तसेच त्यांना भ्रमणध्वनी द्वारे चित्रिकरण (Video Recording) करण्यास सक्त मनाई आहे. असे आढळून आल्यास त्यांना अपात्र घोषीत करण्यात येईल व त्यांचा भ्रमणध्वनी (Mobile) जप्त करण्यात येईल.

७) सामाजिक व समांतर आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रे व छायांकित स्वसाक्षांकित प्रतींचे ०२ संच आणणे अनिवार्य आहे.

## सोबत आणावयाच्या कागदपत्रांची यादी.

| अ.क्र. | प्रमाणपत्र / कागदपत्र |
|---|---|
| १ | अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता) |
| २ | वयाचा पुरावा |
| ३ | शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा |
| ४ | अधिवास (Domicile) प्रमाणपत्र |
| ५ | सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीय असल्या बाबतचा पुरावा |
| ६ | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक असल्या बाबतचा पुरावा. |
| ७ | अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडू आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १३ | भुकंपग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १४ | अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १५ | एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा (महिला उमेदवारांनी त्यांच्या विवाहानंतर नावात बदल झाले असल्यास राजपत्र, विवाह प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र सोबत आणावे.) |
| १६ | अराखीव महिला, मागासवर्गीय, आ.दु.घ., खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, अनाथ, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र |
| १७ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा. |

कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीची प्रक्रिया पार पडल्या नंतर पात्र-अपात्र उमेदवारांची यादी संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळ www.gmcnagpur.org वर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल. त्या नंतर उमेदवारांची निवड प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

सहपत्रः- १. वेळापत्रक
२. प्रवर्गनिहाय उमेदवारांची यादी

(डॉ.राज गजभिये)
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती तथा अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर

# वेळापत्रक

स्थळ :- एम.आय.टी. हॉल, ई-ग्रंथालय (E-Library) इमारती मध्ये, अधिष्ठाता कार्यालयाचे वाजुला, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर

| अ.क्र. | वार व दिनांक | वेळ | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | गुरुवार<br>दिनांक ०७/११/२०२४ | **पहिले सत्र**<br>वेळ सकाळी १०.०० ते ०१.३० पर्यंत | खुला - महिला<br>खुला - माजी सैनिक |
| | | **दुसरे सत्र**<br>वेळ दुपारी ०२.०० ते ०६.०० पर्यंत | खुला - सर्वसाधारण<br>खुला - पदवीधर अंशकालीन<br>खुला - खेळाडू<br>खुला - प्रकल्पग्रस्त<br>खुला - भुकंपग्रस्त |
| २. | शुक्रवार<br>दिनांक ०८/११/२०२४ | **पहिले सत्र**<br>वेळ सकाळी १०.०० ते ०१.३० पर्यंत | अजा - सर्वसाधारण<br>अजा - महिला<br>अजा - माजी सैनिक<br>अजा - पदवीधर अंशकालीन<br>अजा - खेळाडू<br>अजा - प्रकल्पग्रस्त<br>अजा - भुकंपग्रस्त |
| | | **दुसरे सत्र**<br>वेळ दुपारी ०२.०० ते ०६.०० पर्यंत | अज - सर्वसाधारण<br>अज - महिला<br>अज - पदवीधर अंशकालीन<br>अज - खेळाडू<br>अज - प्रकल्पग्रस्त |
| | | | वि.जा.अ. - सर्वसाधारण<br>वि.जा.अ. - महिला<br>वि.जा.अ. - माजी सैनिक<br>वि.जा.अ. - खेळाडू<br>वि.जा.अ. - प्रकल्पग्रस्त |
| | | | भ.ज.(ब) - सर्वसाधारण<br>भ.ज.(ब). - महिला<br>भ.ज.(ब). - खेळाडू<br>भ.ज.(ब). - प्रकल्पग्रस्त |
| ३. | सोमवार<br>दिनांक ११/११/२०२४ | **पहिले सत्र**<br>वेळ सकाळी १०.०० ते ०१.३० पर्यंत | इ.मा.व. - सर्वसाधारण<br>इ.मा.व. - माजी सैनिक<br>इ.मा.व. - खेळाडू |
| | | **दुसरे सत्र**<br>वेळ सकाळी ०२.०० ते ०६.०० पर्यंत | इ.मा.व. - महिला<br>इ.मा.व. - पदवीधर अंशकालीन<br>इ.मा.व. - प्रकल्पग्रस्त<br>इ.मा.व. - भुकंपग्रस्त<br>**दिव्यांग** |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | मंगळवार<br>दिनांक १२/११/२०२४ | **पहिले सत्र**<br>वेळ सकाळी १०.०० ते ०१.३० पर्यंत | भ.ज.(क) - सर्वसाधारण<br>भ.ज.(क). - महिला<br>भ.ज.(क). - माजी सैनिक<br>भ.ज.(क). - खेळाडू<br>भ.ज.(क). - प्रकल्पग्रस्त |
| | | | भ.ज.(ड) - सर्वसाधारण<br>भ.ज.(ड). - महिला<br>भ.ज.(ड). - माजी सैनिक<br>भ.ज.(ड). - खेळाडू<br>भ.ज.(ड). - प्रकल्पग्रस्त |
| | | | वि.मा.प्र. - सर्वसाधारण<br>वि.मा.प्र. - महिला |
| | | **दुसरे सत्र**<br>वेळ सकाळी ०२.०० ते ०६.०० पर्यंत | आ.दु.घ. - सर्वसाधारण<br>आ.दु.घ. - महिला<br>आ.दु.घ. - माजी सैनिक<br>आ.दु.घ. - खेळाडू<br>आ.दु.घ. - प्रकल्पग्रस्त<br>आ.दु.घ. - भुकंपग्रस्त<br>अनाथ |

(डॉ.राज गजभिये)
सदस्य सचिव,
जिल्हा निवड समिती तथा अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
नागपूर